प्रेस नोट

स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव
दिनांक : १७/०५/२०२५

प्रति,

संपादक,

------------------------------

**ऑपरेशन शोध मोहिम अंतर्गत जळगांव जिल्हयातील एकुण २३४ मिसींग व्यक्तींचा शोध घेतला**

---

मा.अपर पोलीस महासंचालक महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग म.रा.मुंबई यांचे कडील निर्देशान्वये दिनांक १७/०४/२०२५ ते दि.१५/०५/२०२५ या कालावधीत हरविलेल्या व्यक्तीचा शोध घेण्याकरीता ऑपरेशन शोध ही विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश दिले होते त्यानुसार डॉ. श्री. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक जळगाव यांनी जळगांव जिल्हयात मिसींग असलेल्या व्यक्तींचा शोध घेणेबाबत जळगाव जिल्हा घटकातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना दि.१७/०४/२०२५ ते दि.१५/०५/२०२५ या कालावधीत विशेष पथक नेमुन मिसींग व्यक्तींचा शोध घेणे बाबत **ऑपरेशन शोध** हि विशेष मोहिम राबविणे बाबत आदेश दिले होते.

**जळगाव जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या पोलीस ठाण्याचे व पोलीस उपविभागाचे विशेष पथकांनी ऑपरेशन शोध मोहिम अंतर्गत दि.१७/०४/२०२५ ते दि.१५/०५/२०२५ या कालावधीत जळगाव जिल्हा घटकातील पोलीस स्टेशनला दाखल मिसींग प्रकरणांपैकी १४७ महिला व ८७ पुरुष असे एकुण २३४व्यक्तीचा यशस्वीरित्या शोध घेवुन त्यांना त्यांचे परिवाराकडे सुपुर्द करण्यात आले आहे.**

ऑपरेशन शोध मोहिम यापुढेही जळगांव जिल्हयामध्ये प्रभाविपणे राबविण्यात येणार असुन जास्तीत जास्त मिसींग व्यक्तींचा शोध घेणेकामी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना मा.पोलीस अधीक्षक जळगाव यांनी आवश्यक त्या सुचना देण्यात आल्याआहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
**जळगांव पोलीस**

Scanned with CamScanner